14 APR 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाकडून पाली भाषेचे पाठ्यपुस्तक लवकरच!

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखे अभिवादन; पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्याची मागणी

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**


डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पाली भाषेचा अभ्यास करून मानवतेचा धम्म जगाला दिला. जगातील लाखो अनुयायी त्याचे आचरण करीत आहेत. शिवाजी विद्यापीठाकडून पाली भाषेचे पाठ्यपुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर आहे. डॉ. आंबेडकर यांचे विचार, कार्यास अनोखे अभिवादन यानिमित्ताने केले जाणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार, देशाचे पहिले कायदामंत्री, अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, दीन-दलितांचे कैवारी, स्त्रियांचे उद्धारक, शेतकरी व कामगारांचे नेते असे अनेक विविध त्यांचे पैलू आहेत. परंतु, त्यांनी पाली भाषेसाठी केलेले कार्य फार कमी लोकांना माहीत आहे. डॉ.




आंबेडकरांनी 'बुद्ध अँड हिज धम्म' हा इंग्रजी ग्रंथ लिहिला. त्यासाठी किंबहुना त्यापूर्वीपासून बौद्ध विचार आणि संस्कृती यांचा ते सातत्याने अभ्यास करत होते. संपूर्ण बौद्ध साहित्य हे मूळ पाली भाषेत असल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्याचा अभ्यास केला. भाषा समजून घेऊन आपल्याला सांस्कृतिक विश्लेषण करता येते, याची जाण असल्याने त्यांनी पाली, इंग्रजी असा शब्दकोश तयार केला.

डॉ. आंबेडकरांनी या



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पाली भाषा शब्दकोशातील हस्ताक्षर.**

शब्दकोशाचे संकलन वयाच्या ५० व्या वर्षी सुरू केले. पाली ही मगध राज्याची बोलीभाषा होती, त्यामुळे बुद्धांचे सर्व मूळ ज्ञान व तत्त्वज्ञान हे पाली भाषेत उपलब्ध आहे. बौद्ध साहित्यामध्ये त्रिपिटक महत्त्वाचे आहेत. ते सुत्तपिटक, विनयपिटक व अभिधम्मपिटक अशा तीन भागांत विभागले आहे. मानवी जीवनाच्या नात्यांचा ऊहापोह या साहित्यातून होतो. पाली, इंग्रजी, मराठी, गुजराती, हिंदी असाही शब्दकोश करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु, तो अपूर्ण अवस्थेमध्ये राहिल्याचे दिसून येते. त्याचबरोबर पाली भाषेचे व्याकरणसुद्धा त्यांनी आपल्या हस्ताक्षरात लिहून ठेवले आहे. महाराष्ट्र शासनाने १९९८ ला प्रकाशित केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग अँड स्पीचेस खंड १६ मध्ये याचा समावेश आहे. हा कोश छापील स्वरूपात ४३६ पानांचा असून त्यामध्ये पाली, इंग्रजी असा हा कोश आहे.

### पाली भाषा शिकणाऱ्यांच्या संख्येत वाढ

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संशोधन व विकास केंद्राच्या वतीने पाली भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम २०२३-२४ पासून सुरू करण्यात आला आहे. त्याला उत्तम प्रतिसाद मिळत असून, प्रवेश संख्या ६० असून, ६६ प्रवेश झाले आहेत. दरवर्षी पाली भाषा शिकणाऱ्यांची संख्या वाढत आहे. एम. ए. पाली भाषा अभ्यासक्रम सुरू करण्याची मागणी होत आहे.

> “ बुद्धांचा संपूर्ण उपदेश पाली भाषेत सामावलेला आहे. त्याकाळचा भारत समजून घ्यावयाचा असेल, तर पाली भाषा शिकणे आवश्यक आहे. डॉ. आंबेडकर यांनी बौद्ध भारताचे रहस्य उलगडण्याचे साधन म्हणून पाली भाषेकडे पाहिले पाहिजे, हे सांगण्याचे काम हा शब्दकोश करतो, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'राईटिंग अँड स्पीचेस' चे संपादक वसंत मून यांनी नोंदविले आहे.
>
> **- डॉ. श्रीकृष्ण महाजन,**
> संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संशोधन व विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ

14 APR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजाराम महाराज (दुसरे) यांच्या चरित्र, रोजनिशीचे उद्या प्रकाशन

कोल्हापूर, ता. १३ : छत्रपती राजाराम महाराज (दुसरे) यांच्या शतकोत्तर अमृतमहोत्सवी जयंतीनिमित्त त्यांचा चरित्रग्रंथ, रोजनिशी यांचे प्रकाशन मंगळवारी (ता. १५) सायंकाळी साडेपाच वाजता मेन राजाराम हायस्कूलमध्ये होणार आहे. राजाराम महाराजांच्या स्मृतींना उजाळा देण्याच्या हेतूने शिवाजी विद्यापीठ आणि छत्रपती राजाराम महाराजांच्या जनक घराण्याचे सदस्य रा. अ. ऊर्फ बाळ पाटणकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

या कार्यक्रमात डॉ. इस्माईल पठाण लिखित छत्रपती राजाराम महाराज (करवीर : दुसरे) या चरित्र ग्रंथाचे आणि डॉ. रघुनाथ कडाकणे यांनी छत्रपती राजाराम महाराजांनी युरोप दौऱ्यावेळी स्वहस्ते लिहिलेल्या इंग्रजी डायरीचा केलेला मराठी अनुवाद असा संयुक्त ग्रंथ प्रकाशन सोहळा होणार आहे. त्याच्या अध्यक्षस्थानी खासदार शाहू महाराज आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते या ग्रंथांचे प्रकाशन होणार आहे. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात, माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर मार्गदर्शन करणार आहेत.

'छत्रपती राजाराम महाराज (दुसरे) यांची कारकीर्द अल्प असली, तरी त्यांनी कोल्हापूरच्या विकासाचे स्वप्न पाहिले. युरोप दौरा करण्याचा धाडसी निर्णय घेतला आणि भारताकडे परतताना फ्लॉरेन्स येथे झालेले आकस्मिक निधन यासारख्या अल्प परिचित गोष्टींचा आढावा घेऊन महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाला उजाळा देण्याच्या हेतूने आणि त्यांच्यातील इतर पैलू या दोन्ही ग्रंथाद्वारे मांडले आहेत. त्यासाठी विद्यापीठाच्या छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. अवनिश पाटील यांचे सहकार्य लाभले आहे. या ग्रंथांच्या माध्यमातून कोल्हापूरच्या इतिहासातील एक नवीन पान उलगडणार आहे. इतिहासप्रेमी, नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि बाळ पाटणकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष

14 APR 2025 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सायकलिंग स्पर्धामध्ये शिवाजी विद्यापीठाचे यश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

बिकानेर राजस्थान येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रोड सायकलिंग स्पर्धामध्ये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरने यश संपादन केले. दि. १० ते १३ एप्रिलदरम्यान ही स्पर्धा झाली. विद्यापीठाच्या संघाने १ रजत व १ कास्यपदकाची कमाई केली.

यामध्ये हनुमान चोपडे याने पुरुष मास स्टार्ट (१०० कि.मी.)



या चित्तथरारक अशा क्रीडा प्रकारात २.५७.१८ अशी वेळ नोंदवत कास्यपदक मिळवले. महिला क्रिटेरियम (३० कि.मी.) या क्रीडा प्रकारात योगेश्वरी कदम हिने अगदी शेवटच्या क्षणी गुजरातच्या खेळाडूस मागे टाकून (८ गुण) मिळवत रजतपदकावर आपले नाव कोरले.

या शिवाय साक्षी पाटील हिने (६ गुण) मिळवत चतुर्थ क्रमांक पटकावला. तब्बल बारा वर्षांनंतर शिवाजी विद्यापीठाने अखिल भारतीय विद्यापीठ रोड सायकलिंग क्रीडा प्रकारात यश मिळवले आहे. संघाचे प्रा. सुशीलकुमार गायकवाड हे प्रशिक्षक म्हणून तसेच प्रा. संतोष जाधव हे सहायक प्रशिक्षक म्हणून काम पाहत आहेत. प्रा. अजय मराठे यांच्याकडे संघ व्यवस्थापक म्हणून जबाबदारी आहे. या संघास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
14 APR 2025 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोड सायकलिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे यश

**कोल्हापूर :** बिकानेर, राजस्थान येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ रोड सायकलिंग स्पर्धामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी अतिशय उत्तम कामगिरी करत १ रजत व १ कांस्य पदकाची कमाई केली. हनुमान चोपडे याने पुरुष मास स्टार्ट (१०० कि.मी.) या चित्त थरारक क्रीडा प्रकारात २.५७.१८ अशी वेळ नोंदवत, अतिशय प्रभावी कामगिरी करत कास्य पदक मिळवले.

महिला क्रीटेरिम (३० कि.मी.) या क्रीडा प्रकारात योगेश्वरी कदम हिने अगदी शेवटच्या क्षणी गुजरातच्या खेळाडूस मागे टाकून (८ गुण) मिळवत रजत पदकावर आपले नाव कोरले. याशिवाय साक्षी पाटील हिने (६ गुण) मिळवत चतुर्थ क्रमांक पटकाविला. तब्बल बारा वर्षानंतर शिवाजी विद्यापीठाने अखिल भारतीय विद्यापीठ रोड सायकलिंग क्रीडा प्रकारात यश मिळवले आहे. या संघाचे प्रा. सुशीलकुमार गायकवाड हे प्रशिक्षक म्हणून तसेच प्रा. संतोष जाधव हे सहाय्यक प्रशिक्षक म्हणून काम पाहत आहेत. प्रा. अजय मराठे यांच्याकडे संघ व्यवस्थापक म्हणून जबाबदारी आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

14 APR 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सायकलिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला दोन पदके

## बिकानेर येथे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रोड स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ब्रिकानेर, राजस्थान येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ रोड सायकलिंग स्पर्धांमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी अतिशय उत्तम कामगिरी करत एक रजत आणि एका कांस्यपदकाची कमाई केली.

हनुमान यशवंत चोपडे याने (१०० कि.मी.) या क्रीडा प्रकारात २.५७.१८ अशी वेळ नोंदवत कांस्यपदक मिळविले. योगेश्वरी महादेव कदम हिने शेवटच्या क्षणी गुजरातच्या खेळाडूस मागे टाकून ८ गुण मिळवत रजतपदकावर नाव कोरले. साक्षी तुकाराम पाटील हिने ६ गुण मिळवत चतुर्थ क्रमांक मिळविला. बारा वर्षांनंतर शिवाजी विद्यापीठाने अखिल भारतीय विद्यापीठ रोड सायकलिंग क्रीडा प्रकारात यश मिळवले.

**८**
गुण मिळवत योगेश्वरी कदम हिने रजतपदकावर नाव कोरले.

प्रा. सुशीलकुमार गायकवाड प्रशिक्षक तसेच प्रा. संतोष जाधव हे सहा. प्रशिक्षक म्हणून काम पाहत आहेत. प्रा. अजय मराठे संघ व्यवस्थापक आहेत. या संघास कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू प्रा.डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 APR 2025
तरुण भारत

# छत्रपती राजाराम महाराज जयंतीनिमित्त उद्या कार्यक्रम

कोल्हापूर: छत्रपती राजाराम महाराज (दुसरे) यांची शतकोत्तर अमृतमहोत्सवी जयंतीनिमित्त १५ एप्रिल २०२५ रोजी मेन राजाराम हायस्कूल येथे सायंकाळी ५.३० वाजता कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. राजाराम महाराजांच्या स्मृतींना उजाळा देण्याच्या हेतूने शिवाजी विद्यापीठ व छत्रपती राजाराम महाराजांच्या जनक घराण्याचे विद्यमान सदस्य रा. अ. उर्फ बाळ पाटणकर यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होणार आहे. बाळ पाटणकर यांच्या संकल्पनेतून व शिवाजी विद्यापीठ प्रकाशित करत असलेल्या छत्रपती राजाराम महाराज यांच्या जीवनावरील डॉ. इस्माईल पठाण लिखित छत्रपती राजाराम महाराज (करवीर: दुसरे) या चरित्र ग्रंथाचे व डॉ. रघुनाथ कडाकणे यांनी छ. राजाराम महाराजांनी युरोप दौऱ्यावेळी स्वहस्ते लिहिलेल्या इंग्रजी डायरीचा मराठी अनुवाद ग्रंथ प्रकाशन सोहळा पार पडेल. अध्यक्षस्थानी खासदार शाहू छत्रपती महाराज असतील तर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते दोन्ही ग्रंथांचे प्रकाशन होईल. ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार, नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात व माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर उपस्थित राहतील. अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व बाळ पाटणकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 APR 2025
पुण्यनगरी

# राजाराम महाराजांच्या चरित्र ग्रंथाचे उद्या प्रकाशन

**कोल्हापूर :** छत्रपती राजाराम महाराज यांच्या जीवनावरील डॉ. इस्माईल पठाण लिखित छत्रपती राजाराम महाराज (करवीर : दुसरे) या चरित्र ग्रंथाचे व डॉ. रघुनाथ कडाकणे यांनी छत्रपती राजाराम महाराजांनी युरोप दौऱ्यावेळी स्वहस्ते लिहिलेल्या इंग्रजी डायरीचा मराठी अनुवाद असा संयुक्त ग्रंथांचा प्रकाशन सोहळा १५ एप्रिल रोजी मेन राजाराम हायस्कूल येथे सायंकाळी ५.३० वाजता होणार आहे. राजाराम महाराज यांची शतकोत्तर अमृतमहोत्सवी जयंती १३ एप्रिल रोजी आहे. शिवाजी विद्यापीठ व बाळ पाटणकर यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. अध्यक्षस्थानी खा. शाहू महाराज असतील. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते दोन्ही ग्रंथांचे प्रकाशन होईल.

14 APR 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘शिक्षणशास्त्र’मध्ये महात्मा फुले जयंती साजरी

कोल्हापूर

क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या वतीने महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. दिल्ली येथील इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठाच्या डॉ. स्मिता पाटील यांचे व्याख्यान झाले. ‘भारतातील उच्च शिक्षण व त्यापुढील आव्हाने’’ हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. प्रास्ताविक अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी केले. यावेळी डॉ. रूपाली संकपाळ, डॉ. सुप्रिया पाटील, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, डॉ. विनया कांबळे, संगीता चंदनवाले, संगीता माने, आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन ममता घोटल यांनी केले. आभार श्रीकांत संकपाळ यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 APR 2025
लोकमत

# शिक्षणशास्त्र अधिविभागात जोतिबा फुले यांची जयंती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागात त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ, दिल्ली येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. स्मिता पाटील यांचे 'भारतातील उच्चशिक्षण व त्यापुढील आव्हाने' या विषयावर व्याख्यान झाले. डॉ. चेतना प्र. सोनकांबळे यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. रूपाली संकपाळ, डॉ. सुप्रिया पाटील, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, डॉ. विनया कांबळे, संगीता चंदनवाले, संगीता माने, संजना भालकर, संजय चव्हाण उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आविष्कार व भित्तीपत्रके या माध्यमातून महात्मा जोतिबा फुले यांचे कार्य विशद केले. ममता घोटल यांनी सूत्रसंचालन केले. श्रीकांत संकपाळ यांनी आभार मानले.